# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार
## क्र. रामाआ/तक्रार/५२/२०२३/नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री. संपत वामन पवार,<br>रा.मु.हिरे नगर, पो.हिसवळ बु., ता.नांदगाव, जि.नाशिक. | वनपरिक्षेत्र अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण व वन्यजीव संरक्षण) मनमाड स्थित चांदवड यांचे कार्यालय, वनवसाहत, मार्केटयार्ड शेजारी, मनमाड रोड, चांदवड, ता.चांदवड, जि.नाशिक-४२३१०१. |

**सुनावणी दिनांक-१७/०१/२०२५**

तक्रारदार यांनी दि.१०/०१/२०२३ रोजीच्या अर्जान्वये "मा.जन माहिती अधिकारी साहेब सहाय्यक वनसंरक्षक(वनीकरण व वन्यजिव संरक्षण) मनमाड स्थित चांदवड, ता.चांदवड, जि.नाशिक यांनी विहीत मुदतीत माहिती दिलेली नाही. माहिती देण्यास नकार दिला. सबब त्यांच्यावर कलम २०(१) नुसार शास्ती लावण्यात यावी. तसेच कलम २०(२) नुसार शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात यावी. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(८)(ख) नुसार मला झालेल्या शारीरिक, माणसिक त्रासापोटी ५०००० रुपये नुकसान भरपाई मिळावी." असे कारण नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सुनावणीसाठी – तक्रारदार अनुपस्थित असून विद्यमान आणि तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.२७/०५/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"मा.सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण व वन्यजीव संरक्षण) मनमाड स्थित चांदवड ता.चांदवड, जि.नाशिक यांचे दालणात प्रथम अपिल दि.१२/०४/२०२२ रोजीच्या पुढील प्रमाणे मुद्देनिहाय माहिती नंबर, १) जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी नांदगाव(प्रा) यांचेकडील दिनांक ०४/०१/२०२२ रोजीचा माहिती अधिकार अर्ज (अ), २) अपिलकर्ता यांनी दिनांक २४/०३/२०२२ रोजी केलेला तसेच ज्या अर्जावर सुनावणी घेण्यात आली तो अपील अर्ज(ब), ३) अपिलकर्त्याच्या अर्जात नमुद माहिती समक्ष दाखवली व ती माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी सो.नांदगाव(प्रा) यांनी समक्ष पुरविण्यात आली ती माहिती, ४) मा.सहाय्यक वनसंरक्षक(वनीकरण व वन्यजीव, संरक्षण) मनमाड स्थित चांदवड सुनावणीच्या वेळी व दिवशी संपूर्ण कार्यवाही लिहीणाऱ्या अधिकारी यांचे नाव पद(हुद्दा) व कार्यवाही तपशिल वरिल प्रमाणे १ ते ४ मुद्यांची सविस्तर तपशिलवार छायांकित आरटीआय लोगोसह प्रमाणीत करुन मिळावी, माहिती मिळावी."

४. सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांचे लेखी निवेदन सादर केले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मी वनपरिक्षेत्र नांदगांव या कार्यालयात दि.२७/०५/२०२२ रोजीच्या अर्जाबाबत मला वनपरिक्षेत्र नांदगांव या कार्यालयात दि.१३/०१/२०२५ रोजी माहिती प्राप्त झालेली आहे त्यासंबंधी माझी कोणतीही तक्रार नाही.

५. सबब, प्रस्तुत तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्र.५२/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. ४७८३

14 JUL 2025